# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०१९ /२०१०

अर्जदार : श्रीमती बिना रंजित बनोदे
राहणार खलाशी लाईन,
शिवमंदीरा जवळ,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री डी. जी. गावनार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. २३.०३.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक ०९.०२.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

अर्जदाराने सदर तक्रार विजेचे बिल मे 2009 पासुन जास्त येत असल्याबदद्ल केलेली आहे. तसेच त्याने विद्युत मिटरची तपासणी करून देण्याची विनंती केलेली आहे. व आलेले विजेचे बिल दुरूस्त करून मागितलेले आहे.

अर्जदाराचा अर्ज दिनांक 09.02.2010 प्रमाणे अर्जदाराने हया मंचास मानसिक व शारीरीक त्रासा पोटी रूपये 5000/– नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. ०३.०३.२०१० रोजी दाखल केले त्यांचे असे म्हणणे आहे की तक्रारकर्त्याला सप्टेंबर 2009 पर्यंत चे विद्युत बील बरोबर देण्यात आले व ते ग्राहकाने भरलेले आहे, ग्राहकाला जुन 2009 मध्ये रिडींग नमुद न करता सरासरी विद्युत बिल 137 युनिटचे देण्यात आले व माहे जुलै 2009 महिन्याचे रिडींग घेवुन दोन महिन्याचे 414 युनीट चे बिल देण्यात आले (प्रत्येक महिन्याला 207 युनीट), जून 2009 च्या बीलाचे क्रेडीत जुलै 2009 मध्ये देण्यात आले.

तसेच ग्राहकाचे मिटर दिनांक 10.12.2009 ला बदलवुन देण्यात आले व नविन मीटरच्या विद्युत वापराप्रमाणे बिल दुरूस्त करून देण्यात आले ग्राहकास बिल दुरूस्त करून 1561.42 पैसे चे क्रेडीट देण्यात आले.

अर्जदाराने विद्युत बिल दुरूस्त करून मिटर तपासण्याबदद्ल विनंती केलेली आहे.

सदर गा–हाण्याची सुचना गैरअर्जदाराला देण्यात आली त्यानंतर गैरअर्जदाराने तक्रारकर्त्याच्या तक्रारीचे निवारण केलेले आहे असे म्हटले.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे एकुण घेतले.

तक्रारकर्त्याने सदर अर्जातील तक्रारीचे निवारण झालेले असुन आता काहीही तक्रार नसल्याचे म्हटले आहे.

तक्रारकर्त्याचा वरील निवेदनावरून सदर तक्रार दप्तरदाखल करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (डी.जी. गावनार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

सदस्य – सचिव

(कार्यकारी अभियंता)

ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)

म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर